# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रसिद्धीपत्रक

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या "स्वच्छता अंगिकारुया, आजारपण पळवूया" या अभियानाचा शुभारंभ**

मिरा भाईंदर शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी महानगरपालिका नेहमीच नवनवीन उपक्रम राबवित असते. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत "स्वच्छ सर्वेक्षण २०२५" या राष्ट्रीय उपक्रमात मिरा भाईंदर शहराला अग्रस्थानी ठेवण्यासाठी "स्वच्छता अंगिकारुया, आजारपण पळवूया" हे विशेष जनजागृती अभियान दिनांक ०१ जुलै २०२५ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत प्रभावीपणे राबवले जात आहे. दि, १० जुलै २०२५ रोजी भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृह, चौथा मजला येथे या अभियानाचा शुभारंभ मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मा. राधाबिनोद अ.शर्मा (भा.प्र.से.) यांच्या हस्ते उत्साहात पार पडला.

यावेळी मा. आयुक्त यांनी गुरु पौर्णिमेच्या शुभेच्छा देत सर्वांना स्वच्छतेच्या सामूहिक जबाबदारीची जाणीव करून दिली. "महानगरपालिका कर्मचारी अगदी पहाटेपासून शहर स्वच्छ ठेवण्यासाठी न थकता काम करत असतो पण प्रत्येक नागरिकाने जबाबदारपणे स्वच्छता पाळली, प्लास्टिकचा वापर टाळला, कचरा योग्य पद्धतीने वर्गीकृत केला तर आपल्या शहराचा स्वच्छतेत आणि सुंदरतेत नक्कीच भर पडेल," अशा भावना आपल्या मनोगतात मा. आयुक्तांनी यावेळी व्यक्त केल्या.

"स्वच्छतेची पाठशाळा – पर्व दूसरे" या अभिनव उपक्रमाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची संस्कृती रुजवली जात आहे. या विशेष उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना कचरा वर्गीकरणाचे महत्त्व Segregation१००@Home अंतर्गत चार प्रकारचे घरगुती कचरा वर्गीकरण, क्यूआर कोडद्वारे कचरा ट्रॅकिंग, घनकचरा व्यवस्थापनातील आधुनिक पद्धतीचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. आणि म्हणूनच या उपक्रमाअंतर्गत शालेय शिक्षकांसाठी खास प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. बिसलेरी आणि मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या शिबिरात बिसलरीच्या पूजा शिंदे यांनी उपस्थित शिक्षकांना प्लास्टिकमुक्त जीवनशैली, प्लास्टिक पुनर्वापर आणि पुनर्प्रक्रियेची सखोल माहिती दिली.

या शुभारंभ सोहळयास प्र. अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, महानगरपालिकेचे अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, कर्मचारी, शिक्षकवृंद व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.